महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२३६१
दिनांक : १२/०७/२०२०

# आदेश

विषय :- पुणे महानगरपालिका हद्दीत कोवीड-१९ चा प्रादुर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना

संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०
४) महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुन २०२०.
५) दि.१०/०७/२०२० रोजी विभागीय आयुक्त कार्यालय पुणे येथे झालेल्या बैठकीतील निर्देश

ज्याअर्थी जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार पुणे महानगरपालिका हद्दीत गतीने पसरत आहे असे दिसून येत आहे. तसेच राज्य शासनाने कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४ च्या तरतुदी दिनांक १३/०३/२०२० च्या अधिसुचनेपासून लागू करण्यात आलेली असून त्या अंतर्गत नियमावली महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम - २०२० तयार करुन दिनांक १४/३/२०२० ला प्रसिध्द करण्यात आली या नियमावलीतील नियम १० नुसार कोव्हिड -१९ चा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहेत.

ज्याअर्थी, महसुल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१, दिनांक

२९ जुन २०२० नुसार निर्देश देण्यात आले आहेत की, स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन महानगरपालिका आयुक्तांस साथरोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक क्षेत्रामध्ये काही उपाययोजनांची अमंलबजावणी करता येईल आणि परवानगी दिलली बिगर अत्यावश्यक कार्ये व नागरिकांच्या संचार करण्यावर आवश्यक ते निर्बंध घालता येतील.

त्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीचे कार्यक्षेत्रातील कोरोना विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करुन वाढती रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे म्हणून विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी वा परिरोध करण्यासाठी तातडीची उपाययोजना म्हणून साथरोग अधिनियम, १८९७ चे कलम २,३ व ४ तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम, २०२० याच्या अन्य सर्व सहाय्यकारी तरतुदी अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पूणे महानगरपालिका हद्दीत मी, विक्रम कुमार, आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे आपल्या अधिकारात या आदेशाद्वारे पुणे शहराचे हद्दीत कोव्हिड - १९ विषाणूचा परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी दिनांक १४/०७/२०२० चे पहाटे ०१:०० वाजे पासून ते दिनांक २३/०७/२०२० रोजीचे रात्री १२:०० वाजेपर्यंत संपूर्ण लॉकडाऊन जाहीर करीत आहे.

सदरील आदेश लागू झाल्यापासून पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात ---

१) पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अस्थापना संपूर्ण बंद राहतील.

| | |
|---|---|
| a. | सर्व किराणा दुकान, सर्व किरकोळ व ठोक विक्रेते, सर्व इतर व्यावसाय करणारे व्यापारी दुकाने दिनांक १४/०७/२०२० ते १८/०७/२०२० पर्यंत संपूर्णतः बंद राहतील. तदनंतर दिनांक १९/०७/२०२० ते २३/०७/२०२० या कालावधीत सकाळी ०८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत केवळ अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी दुकाने व त्यांचे ठोक विक्रेते यांची दुकाने सुरु राहतील, इतर सर्व दुकाने व अस्थापना बंद राहतील. |
| b. | Zomato, Swigy व तत्सम ऑनलाईन पोर्टलवरून मागविले जाणारे खाद्यपदार्थ पुरवठा सेवा दिनांक १४/०७/२०२० चे पहाटे ०१:०० वाजे पासून ते दिनांक २३/०७/२०२० रोजीचे रात्री १२:०० वाजेपर्यंत बंद राहतील. |
| c. | सार्वजनिक / खाजगी क्रिडांगणे /मोकळया जागा, उद्याने, बगीचे हे संपूर्णतः बंद राहतील. तसेच सार्वजनिक ठिकाणी Morning walk व Evening walk प्रतिबंधीत राहील. |
| d. | उपहारगृह, बार, लॉज, हॉटेल्स (वंदे भारत योजने अंतर्गत कोविड-१९ |

| | |
|---|---|
| | करीता वापरात असलेले वगळुन), रिसॉर्ट, मॉल, बाजार, मार्केट संपूर्णत बंद राहतील. |
| e. | सर्व केश कर्तनालय / सलुन/स्पॉ/ ब्युटी पार्लर दुकाने संपूर्णतः बंद राहतील. |
| f. | सर्व किरकोळ व ठोक विक्रीचे ठिकाणे मोंढा / आडत भाजी मार्केट / फळे विक्रेते / आठवडी व दैनिक बाजार/ फेरीवाले हे सर्व ठिकाणी दिनांक १४/०७/२०२० ते १८/०७/२०२० पर्यंत संपूर्णतः बंद राहतील. तदनंतर दिनांक १९/०७/२०२० ते २३/०७/२०२० या कालावधीत केवळ सर्व अत्यावश्यक किरकोळ व ठोक विक्रीचे ठिकाणे मोंढा / आडत भाजी मार्केट / फळे विक्रेते, दैनिक भाजी बाजार या कालावधीत सकाळी ०८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत चालु राहतील. |
| g. | मटन, चिकन, अंडी, मासे इत्यादी ची विक्री दिनांक १४/०७/२०२० ते १८/०७/२०२० पर्यंत संपूर्णतः बंद राहतील. तदनंतर दिनांक १९/०७/२०२० ते २३/०७/२०२० या कालावधीत सकाळी ०८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत चालु राहतील. |
| h. | शाळा, महाविद्यालय, शैक्षणीक संस्था, प्रशिक्षण संस्था सर्व प्रकारचे शिकवणी वर्ग संपूर्णतः बंद राहतील. |
| i. | सार्वजनीक व खाजगी प्रवासी वाहने- दोन चाकी, तीन चाकी व चार चाकी संपूर्णतः बंद राहतील तथापी, अत्यावश्यक सेवेतील वाहने, पुर्व परवानगी प्राप्त वाहने तसेच विमानतळ, रेल्वे स्टेशन येथे जाणे-येणे करिता व वैद्यकीय कारणास्तव प्रवासासाठी खाजगी वाहनाचा वापर अनुज्ञेय राहील. |
| j. | शहरातील सार्वजनिक व खाजगी बस सेवा, ट्रक, टेम्पो, ट्रेलर, ट्रॅक्टर इत्यादीसाठी संपूर्णतः बंद राहतील. तथापि, कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काम करणारे पुणे महानगरपालिकेचे, पोलिस विभागाचे व राज्य व केंद्रीय विभागांचे विनिर्दिष्ट कर्मचारी व वाहने तसेच अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचारी व वाहनांना सदरच्या आदेशानुसार वगळण्यात येत आहेत.तसेच अत्यावश्यक सेवा व वस्तू यांचा पुरवठा करणारी घाऊक वाहतूक सदरच्या आदेशातून वगळण्यात येत आहे. |
| k. | सर्व प्रकारचे बांधकाम /कंस्ट्रक्शनची कामे संपूर्णतः बंद राहतील तथापी ज्या बांधकामाच्या जागेवर कामगारांची निवास व्यवस्था ( In-Situ construction) असेल त्यांना काम सुरू ठेवता येईल. |
| l. | सर्व चित्रपटगृह, व्यायामशाळा, जलतरण तलाव, करमणूक उद्योग, नाटयगृह, बार, प्रेक्षागृह, सभागृह संपूर्णतः बंद राहतील. |
| m. | सर्व प्रकारचे मंगल कार्यालय, हॉल तसेच लग्न समारंभ, स्वागत समारंभ |

| | |
|---|---|
| | संपूर्णतः बंद राहतील. मात्र यापुर्वि परवानगी घेतलेले लग्न समारंभ २० पेक्षा कमी व्यक्तींच्या उपस्थितीमध्ये आयोजीत करता येतील. |
| n. | सर्व प्रकारच्या खाजगी आस्थापना कार्यालये संपूर्णतः बंद राहतील. |
| o. | सामाजीक/ राजकीय/क्रिडा/ मनोरंजन / सांस्कृतीक /धार्मीक कार्यक्रम व सभा संपूर्णतः बंद राहतील. |
| p. | धार्मीक स्थळें / सार्वजनिक प्रार्थनास्थळें संपूर्णतः बंद राहतील. |
| q. | पुणे शहरातील सर्व खाजगी कार्यालये बंद राहतील. |
| r. | E- Commerce सेवा उदा. Amazon, Flipkart व तत्सम सेवा १४/०७/२०२० ते १८/०७/२०२० पर्यंत संपूर्णतः बंद राहतील. तदनंतर दिनांक १९/०७/२०२० पासुन चालु राहतील. |

**२. तथापि, खालील अत्यावश्यक बाबी / सेवा मर्यादीत स्वरुपात व निर्बंधासह सुरु राहतील .**

| | |
|---|---|
| a. | दुध विक्री व दुधाचे घरपोच वितरण संपूर्ण कालावधीत अनुज्ञेय राहील. |
| b. | सर्व खाजगी व सार्वजनिक वैद्यकीय सेवा, पशुचिकित्सा सेवा त्यांचे नियमीत वेळेनूसार सुरु राहतील . |
| c. | सर्व रुग्णालये व रुग्णालयाशी निगडीत सेवा आस्थापना त्यांचे नियमीत वेळेनुसार सुरु राहतील व कोणतेही रुग्णालय लॉकडाऊनचा आधार घेऊन रुग्णांना आवश्यक सेवा नाकरणार नाही. अन्यथा संबंधित रुग्णसेवा संस्था कारवाईस पात्र राहील. |
| d. | सर्व मेडीकल दुकाने तसेच ऑनलाईन औषध वितरण सेवा संपुर्ण कालावधी करीता सुरु राहतील. |
| e. | सर्व मा. न्यायालये व राज्य शासनाचे / केंद्र शासनाचे कार्यालये तसेच शासन अंगीकृत उपक्रम व स्थानिक स्वराज्य संस्थेची कार्यालये महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र ४ नुसार दिनांक २९/०६/२०२० चे आदेशानुसार १०% कर्मचारी वर्गासह सुरु राहतील. शक्य असल्यास work from home चा पर्याय वापरण्यात यावा. शासकीय कार्यालयांना आवश्यक कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक पासची आवश्यकता राहणार नाही, तथापि संबंधित शासकीय कर्मचाऱ्याने स्वतःचे ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक राहील. |
| f. | पेट्रोलपंप व गॅसपंप सकाळी ९.०० ते दुपारी २.०० या वेळेत सुरु राहतील व ते केवळ शासकीय वाहने व अत्यावश्यक सेवेतील व पुरवठा साखळीतील वाहनास इंधन पुरवठा करतील. |

| | |
|---|---|
| g. | एलपीजी गॅस सेवा घरपोच गॅस वितरण नियमानुसार राहील. |
| h. | औद्योगीक व इतर वस्तुंची पुरवठा साखळी अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक अशी स्थानिक, अंतरजिल्हा, अंतरराज्य वाहतुक शासकीय नियमानुसार सुरु राहील. |
| i. | दैनिक वर्तमानपत्रे, नियतकालिके यांची छपाई व वितरण व्यवस्था तसेच डिजीटल / प्रिंटमिडीया यांची कार्यालये शासकीय नियमानुसार सुरु राहतील. वर्तमानपत्रांचे वितरण सकाळी ६ ते ९ या वेळेमध्येच अनुज्ञेय राहील. |
| j. | पाणीपुरवठा करणारे टँकरला नियमानुसार परवानगी राहील. |
| k. | संस्थात्मक अलगिकरण / विलगीकरण व कोव्हिड केअर सेंटर करता महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या व मान्यता दिलेल्या कार्यालयाच्या जागा, इमारती नियमानुसार सुरू राहतील. |
| l. | सर्व राष्ट्रीयकृत व आरबीआयने मान्यता दिलेल्या बँका नियमानुसार किमान मनुष्यबळासह सुरु राहतील. बँकेच्या इतर ग्राहकसेवा जसे ऑनलाईन, एटीएम सेवा सुरु राहतील. |
| m | संपुर्ण पुणे शहराचे हददीतील मा. न्यायालयाचे कर्मचारी, अधिकारी, मा.न्यायाधीश, वकील, शासकीय राज्य / केंद्र शासनाचे कर्मचारी, शासन अंगिकृत कर्मचारी, डॉक्टर नर्स, अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर, वर्तमानपत्र, प्रिंटीग व डिजीटल मिडीयाचे कर्मचारी, फार्मा व औषधी संबधित मेडीकल शॉपचे कर्मचारी, दुध विक्रेते, अत्यावश्यक सेवा जसे कृषी, बी-बियाणे, खते, गॅस वितरक, पाणी पुरवठा, आरोग्य व स्वच्छता करणारे शासकीय व खाजगी कामगार, अग्निशमन सेवा, जलनि:सारण तसेच पूर्वपावसाळी व पावसाळयादरम्यान करावयाची अत्यावश्यक कामे करणारे, वीज वहन व वितरण कंपनीचे कर्मचारी, महानगरपालिकेचे कर्मचारी, पोलीस विभागाचे कर्मचारी, महसुल विभागाचे कर्मचारी तसेच कंन्टेमेंट झोन करीता नियुक्त कर्मचारी यांनाच चारचाकी, दुचाकी (स्वतःकरीता फक्त) वाहन वापरण्यास परवानागी राहील. या सर्व कर्मचारी/अधिकारी यांनी स्वतःचे कार्यालयाचे ओळखपत्र तसेच शासकीस कर्मचारी सोडुन इतरांनी स्वतःचे आधार कार्ड सोबत ठेवावे व वाहनाचे आवश्यक परवाने सोबत ठेवावे. या सर्वांना वाहन फक्त शासकीय कामासाठी अथवा त्यांचे कामाचे जबाबदारी नुसार व शासकीय अथवा त्यांच्या संस्थेने दिलेल्या वेळेतच वापरता येईल. |

| | |
|---|---|
| n. | औषध व अन्न उत्पादन, सलग प्रक्रिया आणि निर्यात उदयोग व त्यांचे पुरवठादार नियमानुसार चालु राहतील व यासाठी एम.आय.डी.सी.पोर्टल वरुन यापुर्वी देण्यात आलेल्या परवानग्या ग्राहय धरण्यात येईल. अद्याप परवानगी न घेतलेल्या उद्योगांनी एम.आय.डी.सी.पोर्टल वरुन परवानगी प्राप्त करावी. |
| o. | पुणे मनपा क्षेत्रामध्ये सुरू असलेले स्मार्ट सिटी अंतर्गत प्रकल्प, मेट्रो, स्मार्ट सिटी, राष्ट्रीय महत्वाचे प्रकल्प इ. यांचे काम पुणे महानगपालिके कडे dmcell@punecorporation.org व www.punepolice.in वर अर्ज करुन पुर्व परवानगीसह सुरू ठेवता येईल. |
| p. | पुणे शहरातुन परवाना असलेल्या उदयोगाना उदयोग क्षेत्रात जाण्यासाठी आणि परतीसाठी परवानगी राहील. मात्र कर्मचाऱ्यांनी त्यांची ओळखपत्रे सोबत ठेवणे बंधनकारक राहील. तथापी ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून येईल त्यामधील सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत उद्योग बंद ठेवण्यात यावा. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| q. | पुणे शहरातील एम.आय.डी.सी. किंवा खाजगी जागेवरील उदयोग चालु राहणार असल्यामुळे त्यांना आवश्यक ते पास www.punepolice.in वर अर्ज करुन पुर्व परवानगीसह कामगारांची वाहतुक निश्चीत बसने करता येईल. |
| r. | माहिती तंत्रज्ञान उद्योग १५% कर्मचारी क्षमतेसह सुरु ठेवता येतील, शक्य असल्यास work from home चा पर्याय वापरण्यात यावा. |
| s. | शेतमालाशी कृषि निगडीत प्रक्रिया उद्योग नियमानुसार चालु राहतील. |
| t. | सर्व वैद्यकीय व्यावसायीक, परिचारीका, पॅरामेडिकल कर्मचारी, सफाई कर्मचारी व अँम्बुलन्स यांना शहराअंतर्गत वाहतूकीसाठी परवानगी राहिल. |
| u. | वृध्द व आजारी व्यक्तींकरीता नियुक्त केलेले मदतनिस यांच्या सेवा सुरु राहतील. |
| v. | जीवनावश्यक वस्तूंचे, औषधांचे घरपोच वाटप सकाळी ८:०० ते रात्री १०.०० या कालवधीतच पोलीस आयुक्त कार्यालयाचे पूर्व मान्यतेने पास घेवून अनुज्ञेय राहिल. सदर सुविधेकरीता फक्त पोलीस आयुक्त कार्यालयाव्दारे निर्गमीत करण्यात आलेला पास ग्राहय धरण्यात येईल. |

पुणे मनपा क्षेत्रातील ६५ वर्षावरील सर्व व्यक्ति, अति जोखमीचे आजार ( मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा, यकृत व मुत्रपिंडाचे आजार, कर्करोग, HIV बाधित रुग्ण इ.) असलेल्या व्यक्ति, गरोदर महिला, वय वर्षे १० पेक्षा कमी वयोगटातील मुले यांना अत्यावश्यक सेवा व वैद्यकीय कारणाशिवाय घराबाहेर जाता येणार नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तिस अत्यावश्यक वैद्यकीय कारणाशिवाय घरा बाहेर पडता येणार नाही. या शिवाय इतर कोणतीही व्यक्ती पायी अथवा सायकलवर अथवा चारचाकी अथवा दोनचाकी वाहन घेऊन घराबाहेर फिरणार नाही, असे इतर कोणतीही व्यक्ती वाहन घेऊन विनाकारण फिरत असल्यास त्याचे चारचाकी / दुचाकी वाहन जप्त करण्यात येईल. त्याचा वाहन परवाना रद्द करण्यात येईल व त्याच्यावर साथरोग नियंत्रण कायद्यातील तरतूदीनुसार व तत्सम इतर कायद्यातील तरतुदीनुसार गुन्हा नोंद करण्यात येईल.

सर्व आस्थापना प्रमुखांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत कर्मचारी यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या भ्रमणध्वनीमध्ये आरोग्य सेतू ऍप डाऊनलोड केल्याची खात्री करून घ्यावी. आरोग्य सेतू ऍपच्या माध्यमातून रोगाची संभाव्य लागण विषयी सुचना प्राप्त होत असल्यामुळे व्यक्तिस स्वसंरक्षासाठी त्याचा उपयोग होतो.

उपरोक्त, आदेशाचे पालन न करणाऱ्या विरुध्द कोणतीही, व्यक्ती, संस्था, भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्याशिवाय, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याची कलमे ५१ ते ६० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास पात्र असतील .

वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असताना कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक ते कृत्य व सद्हेतूने केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचे विरुंध्द कुठल्याही प्रकारची कायदेशीर कार्यवाही अथवा खटला दाखल करता येणार नाही. ( आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ७३)

उपरोक्त, नमूद ठिकाणे, संबंधित व्यक्ती, आस्थापना, मालक / चालक/आयोजक / व्यवस्थापक/ कार्यालये इत्यादी यांना प्रत्येकास स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ मधील प्राप्त अधिकाराचा वापर करुन सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, सर्व महानगरपालिकेचे कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, सर्व पोलीस ठाणे यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेले कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापना बाबतचे राष्ट्रीय निर्देशाचे पालन करणे बंधनकारक आहे. (जोडपत्र-एक)

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १२/०७/२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण :- पुणे
दिनांक :- १२/०७/२०२०

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रत :- माहितीस्तव सादर

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर,
२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे
३. मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर
४. मा. जिल्हाधिकारी, पुणे
५. मा.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे
६. सर्व पोलीस स्टेशन पुणे शहर
७. तहसीलदार पुणे शहर / हवेली
८. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

## जोडपत्र - एक

## कोव्हिड - १९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निर्देश

१. मुखपट्टीचा वापर करणे :- सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी व प्रवास करताना, मुखपट्टीचा / फेस मार्कचा वापर करणे अनिवार्य आहे. मुखपट्टीचा वापर न केल्यास सदर व्यक्ती दंडनिय कार्यवाहीस पात्र राहील.

२. सामाजिक अंतर राखणे :- सार्वजनिक ठिकाणी, सर्व व्यक्तींनी कमीत कमी ६ फुट ( २ गज की दुरी) इतके अंतर राखले पाहिजे. दुकानदार, ग्राहकांमध्ये शारीरिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील आणि एकावेळी पाचपेक्षा अधिक व्यक्तींना मुभा देणार नाहीत.

३. एकत्र जमणे :- मोठी सार्वजनिक संमेलने / भव्य सभा यास नियमितपणे मनाई असेल. अंत्यसंस्कार / अंत्यविधी यासबंधातील कार्यक्रमात एकत्र जमणे - व्यक्तींची संख्या २० पेक्षा अधिक असणार नाही.

४. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हे संपूर्णत: प्रतिबंधित करण्यात येत आहे. उल्लघन करणा-या व्यक्ति दंडांच्या शिक्षेस पात्र असेल.

५. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, पान, तंबाखू, इत्यादींच्या सेवनास मनाई आहे.

६. कामाच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निर्देश

७. घरातून काम करणे :- शक्य असले तेथवर, घरुन काम करण्याची पध्दत अनुसरण्यात यावी. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, बाजारपेठा आणि औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यामध्ये कामाच्या / कामकाजाच्या वेळांची सुनियोजितपणे आखणी करावी.

८. परिक्षण (स्क्रीनिंग) व स्वास्थ :- औष्णिक परीक्षण (थर्मल स्क्रिनिंग) हात स्वच्छ करण्याचे द्रव्य (हॅण्डवॉश) व निर्जतुंकीकरण द्रव्य (सॅनिटायझर) हे सर्व प्रवेशद्वाराजवळ व निर्गमन द्वाराजवळ आणि सामाजिक क्षेत्रात पुरविण्यात येईल.

९. वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) :- संपूर्ण कामाच्या ठिकाणचे, सामाजिक सुविधांचे व मानवी संपर्कात येणाऱ्या सर्व जागा यांचे, उदाहरणार्थ दरवाजांच्या मुठी (डोअर हॅण्डल) इत्यादींचे कामाच्या पाळयामध्ये वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) करण्याची सुनिश्चिती करण्यात येईल.

१०. सामाजिक अंतर राखणे :- कामाच्या ठिकाणांच्या सर्व प्रभारी व्यक्ती, कामगारांचे पुरेसे अंतर राखणे, कामाच्या पाळ्यांदरम्यान पर्याप्त अंतर ठेवणे, दुपारच्या जेवणाच्या वेळेंत पुरेसे अंतर राखणे, इत्यादींद्वारे सामाजिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील.

११. संपुर्ण कार्यालयामधील सार्वजनिक जागा, वारंवार हाताळले जाणारे भाग जसे की दाराचे हँडल इत्यादीचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणेत यावे.

१२. कार्यालय प्रमुखांनी कार्यालयामध्ये शारीरीक अंतर, कार्यरत कर्मचाऱ्यांमध्ये योग्य अंतर, दोन शिफ्ट मध्ये पुरेसा वेळ, जेवणाचे सुट्टीते नियोजन योग्य प्रकारे होईल याची दक्षता घ्यावी.